**L. A. BILL No. XXXIII OF 2022.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA INDUSTRIAL RELATIONS ACT, THE MAHARASHTRA LABOUR WELFARE FUND ACT, THE MAHARASHTRA *MATHADI, HAMAL* AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1969, THE MAHARASHTRA PRIVATE SECURITY GUARDS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1981 AND THE MAHARASHTRA WORKMEN'S MINIMUM HOUSE-RENT ALLOWANCE ACT, 1983.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३.**

**महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ व महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक २० मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ व महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९४७ चा ११.
१९५३ चा ४०.
१९६९ चा महा. ३०.
१९८१ चा महा. ५८.
१९८८ चा महा. २३.

## प्रकरण एक

## **प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## **महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियमाची सुधारणा.**

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १०४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियमाच्या (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "औद्योगिक संबंध अधिनियम" असा केला आहे) कलम १०४ मधील, "दोहों प्रकारांपैकी कोणत्याही प्रकारच्या पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल" या मजकुराऐवजी, " पाच लाख रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९४७ चा ११.

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १०६ ची सुधारणा.

**३.** औद्योगिक संबंध अधिनियमाच्या कलम १०६ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा ज्या ज्या दिवशी हे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल पराकाष्ठा ५,००० रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल" या मजकुराऐवजी, " पाच लाख रुपये इतक्या दंडास पात्र होईल आणि ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी पाच हजार रूपये इतक्या दंडास पात्र होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## **महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमाची सुधारणा.**

सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १७अ ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "कामगार कल्याण निधी अधिनियम" असा केला आहे ) याच्या कलम १७अ मध्ये,— १९५३ चा ४०.

(१) खंड (अ) व (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

" (अ) पहिल्या अपराधासाठी, एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल;

(ब) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी, दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल : " ;

(२) परंतुकामधील, "पन्नास रुपयांहून" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**५.** कामगार कल्याण निधी अधिनियमाच्या कलम १७ब नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ४० यामध्ये नवीन कलम १७क चा समावेश करणे.

**"१७क.** (१) कलम १७अ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध, आरोपी व्यक्तीच्या अर्जावरून, एकतर, कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, अशा अपराधासाठी तरतूद केलेल्या दंडाच्या रकमेने, विहित करण्यात येईल अशा रीतीने, कल्याण आयुक्ताद्वारे, आपसमेळ करता येईल. अपराधांची आपसमेळ करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट,—

(अ) जो यापूर्वी आपसमेळ केलेला होता तोच अपराध केल्याच्या ; किंवा

(ब) ज्यासाठी व्यक्तीला आधीच दोषसिद्ध ठरवलेले होते तोच अपराध केल्याच्या,

तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीत, दुसऱ्या वेळी किंवा त्यानंतर, एखाद्या व्यक्तीने केलेल्या अपराधासाठी लागू असणार नाही.

(३) कल्याण आयुक्त, राज्य शासनाच्या निदेशास, नियंत्रणास व पर्यवेक्षणास अधीन राहून, अपराधाचा आपसमेळ करण्याच्या अधिकारांचा वापर करील.

(४) अपराधाची आपसमेळ करण्याचा प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने करण्यात येईल.

(५) जेव्हा कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी, कोणत्याही अपराधाची आपसमेळ केली असेल तेव्हा, ज्याच्या संबंधात अशी आपसमेळ केलेली असेल त्या अपराध्याविरुद्ध अशा अपराधाच्या संबंधात कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

(६) जेव्हा कोणताही खटला दाखल केल्यानंतर कोणत्याही अपराधाची आपसमेळ केली असेल तेव्हा, अशी आपसमेळ, कल्याण आयुक्तांकडून, असा खटला ज्या न्यायालयासमोर प्रलंबित आहे त्या न्यायालयास, लेखी स्वरूपात निदर्शनास आणण्यात येईल आणि अपराधाचा आपसमेळ केल्याची अशी नोटीस देण्यात आल्यावर, ज्या व्यक्तीच्या विरोधातील अपराधाची आपसमेळ केली आहे त्या व्यक्तीला मुक्त करण्यात येईल.

(७) या कलमाच्या तरतुदींन्वये व त्यानुसार असेल त्याखेरीज, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची आपसमेळ करण्यात येणार नाही.".

## प्रकरण चार

## महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ याची सुधारणा.

१९६९ चा महा. ३०. **६.** महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम" असा केलेला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३ ची सुधारणा.

" (३) योजनेत आणखी अशीही तरतूद करता येईल की,—

(एक) तिच्या कोणत्याही तरतुदीच्या पहिल्या उल्लंघनासाठी, दोषसिद्ध झाल्यावर, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेपर्यंत वाढविता येईल (परंतु, कोणत्याही बाबतीत पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल) इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल ;

(दोन) तिच्या कोणत्याही तरतुदीच्या दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या उल्लंघनासाठी, दोषसिद्ध झाल्यावर, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेपर्यंत वाढविता येईल (परंतु, कोणत्याही बाबतीत दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल) इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल ; आणि

(तीन) जर दोषसिद्धीनंतर उल्लंघन करण्याचे चालू राहिले तर, ज्या दिवशी अशा प्रकारचे उल्लंघन चालू राहिले असेल अशा प्रत्येक दिवसासाठी पाच हजार रुपयापर्यंत वाढवता येईल इतक्या आणखी दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.".

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २७ ची सुधारणा.

**७.** माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,—

(१) "पाचशे रुपयांच्या" या मजकुराऐवजी, "पाच लाख रुपयांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) "शंभर रुपयांच्या" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० यामध्ये नवीन कलम २७-१अ समाविष्ट करणे.

**८.** माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियमाच्या कलम २७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

अपराधांची आपसमेळ.

"**२७-१अ.** (१) योजनेअन्वये, शिक्षापात्र असलेला कोणत्याही योजनेच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दलचा कोणताही अपराध, आरोपी व्यक्तीच्या अर्जावरून, एकतर कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, अशा अपराधासाठी तरतूद केलेल्या कमाल दंडाच्या पन्नास टक्के इतक्या रकमेसाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने, संबंधित मंडळाच्या अध्यक्षाद्वारे आपसमेळ करता येईल :

परंतु, अशी आपसमेळाची रक्कम, त्या मंडळाच्या प्रशासकीय प्रयोजनासाठी स्थापन केलेल्या संबंधित मंडळाच्या प्रशासकीय खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट,–

(अ) जो यापूर्वी आपसमेळ केलेला होता तोच अपराध केल्याच्या ; किंवा

(ब) ज्यासाठी व्यक्तीला आधीच दोषसिद्ध ठरवलेले होते तोच अपराध केल्याच्या,

तारखेपासून तीन वर्षांच्या कालावधीत दुसऱ्या वेळी किंवा त्यानंतर, एखाद्या व्यक्तीने केलेल्या अपराधासाठी लागू असणार नाही.

(३) जेव्हा कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी कोणत्याही अपराधाची आपसमेळ केली असेल तेव्हा, ज्याच्या संबंधात अशी आपसमेळ केलेली असेल त्या अपराध्याविरुद्ध अशा अपराधाच्या संबंधात कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

(४) जेव्हा कोणताही खटला दाखल केल्यानंतर कोणत्याही अपराधाची आपसमेळ केली असेल तेव्हा, अशी आपसमेळ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संबंधित मंडळाच्या अध्यक्षाकडून, असा खटला ज्या कामगार किंवा औद्योगिक न्यायालयासमोर प्रलंबित आहे त्या न्यायालयास लेखी स्वरूपात निदर्शनास आणण्यात येईल आणि अपराधाचा आपसमेळ केल्याची अशी नोटीस देण्यात आल्यावर, ज्या व्यक्तीच्या विरोधातील अपराधाची आपसमेळ केली आहे त्या व्यक्तीला मुक्त करण्यात येईल.

(५) या कलमाच्या तरतुदींन्वये व त्यानुसार असेल त्याखेरीज, या योजनेन्वये शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची आपसमेळ करण्यात येणार नाही.''.

प्रकरण पाच

**महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ याची सुधारणा.**

१९८१ चा महा. ५८.

**९.** महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश ''खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियम'' असा केला आहे) याच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

''(३) योजनेत आणखी अशीही तरतूद करता येईल की,—

(एक) तिच्या कोणत्याही तरतुदीच्या पहिल्या उल्लंघनासाठी, दोषसिद्ध झाल्यावर, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेपर्यंत वाढविता येईल (परंतु, कोणत्याही बाबतीत पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल) इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल;

(दोन) तिच्या कोणत्याही तरतुदीच्या दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या उल्लंघनासाठी, दोषसिद्ध झाल्यावर, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेपर्यंत वाढविता येईल (परंतु, कोणत्याही बाबतीत दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल) इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल; आणि

(तीन) जर दोषसिद्धीनंतर उल्लंघन करण्याचे चालू राहिले तर, ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहिले असेल त्या प्रत्येक दिवसासाठी पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या आणखी दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.''.

**१०.** खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,—

(१) ''पाचशे रुपयांच्या'' या मजकुराऐवजी, ''पाच लाख रुपयांच्या'' हा मजकूर दाखल करण्यात येईल; सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम २७ ची सुधारणा.

(२) ''शंभर रुपयांच्या'' या मजकुराऐवजी, ''पाच हजार रुपयांच्या'' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**११.** खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियमाच्या कलम २७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ यात नवीन कलम २७अ समाविष्ट करणे.

अपराधांची आपसमेळ.

"**२७अ.** (१) योजनेअन्वये, शिक्षापात्र असलेला, कोणत्याही योजनेच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दलचा कोणताही अपराध, आरोपी व्यक्तीच्या अर्जावरून, एकतर कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, अशा अपराधासाठी तरतूद केलेल्या कमाल दंडाच्या पन्नास टक्के इतक्या रकमेसाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने, संबंधित मंडळाच्या अध्यक्षाद्वारे आपसमेळ करता येईलः

परंतु, अशी आपसमेळाची केलेली रक्कम, त्या मंडळाच्या प्रशासकीय प्रयोजनासाठी स्थापन केलेल्या संबंधित मंडळाच्या प्रशासकीय खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट,–

(अ) जो यापूर्वी आपसमेळ केलेला होता तोच अपराध केल्याच्या ; किंवा

(ब) ज्यासाठी व्यक्तीला आधीच दोषसिद्ध ठरवलेले होते तोच अपराध केल्याच्या,

तारखेपासून तीन वर्षांच्या कालावधीत दुसऱ्या वेळी किंवा त्यानंतर, एखाद्या व्यक्तीने केलेल्या अपराधासाठी लागू असणार नाही.

(३) जेव्हा कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी कोणत्याही अपराधाची आपसमेळ केली असेल तेव्हा, ज्याच्या संबंधात अशी आपसमेळ केलेली असेल त्या अपराध्याविरुद्ध अशा अपराधाच्या संबंधात कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

(४) जेव्हा कोणताही खटला दाखल केल्यानंतर कोणत्याही अपराधाची आपसमेळ केली असेल तेव्हा, अशी आपसमेळ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संबंधित मंडळाच्या अध्यक्षाकडून, असा खटला ज्या न्यायालयासमोर प्रलंबित आहे त्या न्यायालयास लेखी स्वरूपात निदर्शनास आणण्यात येईल आणि अपराधाचा आपसमेळ केल्याची अशी नोटीस देण्यात आल्यावर, ज्या व्यक्तीच्या विरोधातील अपराधाची आपसमेळ केली आहे त्या व्यक्तीला मुक्त करण्यात येईल.

(५) या कलमाच्या तरतुदींन्वये व त्यानुसार असेल त्याखेरीज, या योजनेअन्वये शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची आपसमेळ करण्यात येणार नाही. ".

## प्रकरण सहा

## महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ याची सुधारणा.

१९८८ चा महा. २३.

**१२.** महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ याच्या कलम १० मध्ये,— सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १० ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मधील, "एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील" या मजकुराऐवजी, "दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मधील, " सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील" या मजकुराऐवजी, "दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३.]**

**[महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**(श्री. सुरेश खाडे,**
कामगार मंत्री.)

**[विधानसभेने दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे]**

**[विधानपरिषदेने दिनांक २० मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.